# डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड

## शरिररचनाशास्त्र विभाग

## <u>देहदान फॉर्म</u>

अर्जदाराचा अलिकडच्या काळातील फोटो येथे चिकटवावा

संपुर्ण नांव..........................................

पत्ता..............................................

..................................................

संपर्क क्रमांक.....................................

दिनांक............................................

प्रति
मा.प्राध्यापक व विभागप्रमुख
शरिररचनाशास्त्र विभाग,
डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, नांदेड

विषय- मरणोत्तर देहदान करण्याची इच्छा...

महोदय,

उपरोक्त विषयानुसार माझ्या मृत्यूनंतर माझे संपूर्ण शरीर शैक्षणीक किंवा इतर कार्यासाठी दान करण्याची इच्छा आहे. आपल्या फार्ममध्ये नमूद केल्याप्रमाणे माझ्या जवळच्या नातेवाईकांनी सदरील इच्छापत्र स्वाक्षरी करुन दिले आहे.

तरी आपणांस विनंती करण्यात येते की माझ्या मृत्युनंतर माझा मृतदेह संशोधन /विच्छेदन किंवा इतर आवश्यक असलेल्या कोणत्याही हेतूकरीता उपयोग करण्यास माझी हरकत नाही.

धन्यवाद,

आपला/आपली विश्वासु,
नांव व स्वाक्षरी

सदरील इच्छापत्र आम्हा सर्वाच्या उपस्थितीत लिहून देण्यात आले आहे. सदर व्यक्तीच्या मरणोत्तर देहदानास आमचा कोणताही आक्षेप नाही. तसेच त्यांच्या मरणोत्तर देहदानानंतर त्यांचा देह शैक्षणिक किंवा इतर कार्यासाठी वापरण्यास आमची काहीही हरकत नाही.

| अनु क्र | नाव | नाते | पत्ता | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

## मरणोत्तर देहदान करु इच्छीणा-या व्यक्ती आणि त्यांच्या नातेवाईकांसाठी आवश्यक असलेली माहिती-

देहदान कायदा १९७६ (सुधारीत) मुंबई ॲनाटॉमी ॲक्ट ५ (ब) प्रमाणे कोणत्याही व्यक्तीने आपल्या जिवंतपणी लेखी अथवा तोंडी देहदानाची इच्छा व्यक्त केली असेल किंवा व्यक्तीच्या निधनांनंतर नातेवाईकांची इच्छा असेल तर मृत व्यक्तीचा मृतदेह अधिकृत वैद्यकीय संस्थानात दान करता येतो त्याकरीता न्यायालय किंवा पोलीसांच्या परवानगीची आवश्यकता नाही. (कॉरोनर कोर्ट परिपत्रक दिनांक २२ जानेवारी, १९८७)

मृत देहाचा उपयोग वैद्यकीय माहाविद्यालयात विद्यार्थ्यांच्या शिक्षणासाठी आणि संशोधनासाठी केला जातो. देहदान हे मोठे कार्य आहे.

## देहदानाची इच्छा आसणा-या व्यक्तीसाठी नियम.....

१) इच्छापत्र हे नातेवाईकांवर बंधनकारक नाही

२) इच्छापत्र भरलेले नसेल तरीही देहदान करता येते पण नातेवाईकास आपली इच्छा लेखी असावी म्हणून इच्छापत्र भरावे.

३) आपल्या इच्छेनुसार धार्मिक विधी करुनही देहदान करु शकता.

४) देहदान रुढीविरोधी आहे पण अधार्मिक नाही.

## निधनानंतर मृताच्या नातेवाईकांची कर्तव्ये...

१) समजुन इच्छापत्र भरले असेल व तुमचा विरोध असेल तरीही म.ताची अंतिम इच्छा पुर्ण करा.

२) निधनानंतर ताबडतोब जवळच्या /फॅमिली डॉक्टरांना बोलावून नैसर्गिक मृत्युचा दाखला घ्यावा त्याची एक प्रत डेहदानाच्या वेळ्स शरिररचनाशास्त्र विभागास सादर करावी.तसेच मृत्यू नोंद प्रमाणपत्राची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

३) मृतदेह दिवसा किंवा रात्री केंव्हाही स्विकारला जाईल.

४) मृतदेह रात्री आणल्यास आपण अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी / वैद्यकीय उप अधिक्षक यांना लेखी विंती अर्ज सादर करुन तो मृतदेह सकाळ पर्यंत शवागारात शीतपेटी ठेवावा.

५) मृत्यूनंतर शक्यतो लवकरात लवकर मृत्यू नंतर ४ ते ६ तासात मृतदेह वैद्यकीय महाविद्यालयात आणावा. कारण उशीरा होवुन मृतदेहाचा वास येवू लागल्यास देहदान करुन काही उपयोग होणार नाही.

६) बहेर गावाहून मृतदेह आणण्यासाठी शासकीय नियमाप्रमाणे गाडीच्या चालकास त्याचा वाहतुक खर्च दिला जाईल गाडीच्या चालकाकडे त्याची छापील पावती असणे बंधनकारक आहे

७) मृतदेह गाडीत ठेवतांना व उतरवीतांना कर्मचा-याना मदत करावी तीच तुमची शेवटची सेवा समजावी

८) मृतदेह आणतांना फक्त जबाबदार व्यक्तीनीच बरोबर यावे

९) देहदानानंतर आपणांस प्रमाणपत्र दिले जाईल

१०) अनैसर्गिक मृत पावलेल्या व्यक्तीचे आणि पोलीसांच्या ताब्यात असलेले मृतदेह देहदानाकरीता शरिररचनाशास्त्र विभागात स्विकारले जाणार नाही याची नोंद घ्यावी.

## देहदानाची पध्दत

डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय नांदेड येथील शरिररचनाशास्त्र विभागात मृतदेह स्विकारले जाईल.

१. मृत्यूनंतर आपला देह दान केला जावा अशी इच्छा असणा-या व्यक्तीला आपली इच्छा एका विशिष्ठ फार्मवर लिहून द्यावी लागते सदरील फार्म हा शरिररचनाशास्त्र विभागात उपलब्ध आहे काही अडचणीमुळे सदरील फार्म भरला गेला नाही परंतु देहदानाची इच्छा जर आपण आपल्या कुटूंबियात प्रगट केली असेल तर मृत्यूनंतर आपले नातेवाईक ऐनवेळी फार्म भरुन देहदान करु शकतात.

२. विभागात विहीत नमुण्यातील फॉर्म भरत असतांना आपला एक फोटो फार्म सोबत लावावा त्याचप्रमाणे फार्मवर नमुद केल्याप्रमाणे जवळच्या नातेवाईकाची (आई ,वडील,पती,पत्नी,मुलगा,मुलगी किंवा इतर) नांवे लिहून त्याची स्वाक्षरी फॉर्मवर घेण्यात यावी आपल्या फार्मची नोंद डोनर रजीस्टरमध्ये घेउन त्यात नोंदणी क्रमांक आपणांस कळविण्यात येईल पुर्ण भरलेल्या फॉर्मची एक छायाकिंत प्रत आपल्या कुटूंबाजवळ देवुन ठेवावी.

३. मृत्यूनंतर देहदान करतांना सोबत मृत्यूचे प्रमाणपत्र ( Death Certificate) आणने आवश्यक आहे. तसेच देहदान करतांना सोबत असलेल्या नातेवाईकापैकी एका व्यक्तीची ओळखपत्राची सत्यप्रत विभागात जमा करावी. मृत्यूनंतर नातेवाईकांनी दुरध्वनीद्वारे तात्काळ वैद्यकीय महाविद्यालयाच्या शरिररचनाशास्त्र विभागात कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा तसेच कार्यालयीन वेळेत व्यतीरिक्त वैद्यकिय उप-अधिक्षक किंवाा अपघात विभागातील वैद्यकीय अधिकारी (C.M.O.) यांच्याशी संपर्क साधावा.

४. मृत्युचे कारण खालीलपैकी असल्यास देहदान स्वीकारले जाणार नाही.
१) गुप्तरोग (एडस , सिफीलालीस) २) रक्तातील जंतुसंसर्ग (सेप्टीसेमिया)
२) रक्ताच्या कावीळ (हिपॅटायटीस-बी) ४) संक्रमीत क्षयरोग (ॲक्टीव्ह टी.बी)
५) धनुर्वात (टिटॅनस) ६) मेडीको - लिगल केसेस (एम.एल.सी.) इत्यादी

## संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक खालील प्रमाणेः-

१) वैद्यकीय अधिकारी, अपघात विभाग, डॉ.शकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड दुरध्वनी क्रमांक ०२४६२-२२९२२७ २३४००३

२) वैद्यकीय उपअधिक्षक , ०२४६२-२२९२२१/२३५७१२/२३५७१३

३) डॉ.वैशाली इनामदार, प्राध्यापक व विभागप्रमुख,शरिररचनाशास्त्र विभाग, डॉ.शंकरराव चव्हाण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय,नांदेड- ९४०४६५९५२५, ८९९९२९७८९९

४) डॉ अनुजा देशमुख, सहयोगी प्राध्यापक ९८२३२६१९८६

५) डॉ.एम.ए.रहेमान ,सहयोगी प्राध्यापक -९४२२१८७८८३

६) डॉ.टेकाळे ,सहाय्यक प्राध्यापक- ९९७००६७६२७

७) डॉ. पुर्वा करडीले, सहाय्यक प्राध्यापक- ९४०४८४७८८७

८) श्री. किशन गिते, प्रयोगशाळा तंत्रज्ञ- ७८४०९९९०१५, ९४२३६५६६०६

९) श्रीमती सुनिता गंजेवार, ९४२०७१६६०७